राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील
माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये प्राप्त तक्रार.

क्र. रामाआ-तक्रार क्र. १५/२०१७/सांगली
राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

श्री. प्रशांत मधुकर चव्हाण — तक्रारदार

विरुध्द

१) जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागीय कार्यालय, कोल्हापुर — उत्तरवादी
२) जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विद्युत उपविभागीय कार्यालय, मिरज
३) जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपिक,
सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागीय कार्यालय, मिरज

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विद्युत उपविभागीय कार्यालय, कोल्हापुर

## सुनावणी दिनांक: १६/०९ /२०२१

तक्रारदार यांनी दि. १०/०३/२०१७ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केला होता.

प्रस्तुत तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने सर्व संबंधितांना Email/Whats Appद्वारे सुनावणीचे सूचना पत्र पाठवून संबंधितांनी Google Meet या व्हिडीओ कॉन्फरन्स माध्यमाद्वारे सुनावणीस उपस्थित रहावे, असे कळविले.

त्यानुसार सुनावणीस तक्रारदार व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीचे वेळी तक्रारदार यांनी असे कथन केले की," माझा तक्रार अर्ज दि. १०/०३/२०१७ रोजीचा असून त्यामध्ये माहिती अर्ज व प्रथम अपिल अर्जावर कोणतीही कारवाई होत नसल्याने संबंधितांची चौकशी होऊन प्रशासकीय कारवाई होणेबाबत अशी तक्रार केलेली आहे. तसेच पुरामध्ये माझे सर्व पेपर्स खराब झाले असल्यामुळे माझ्याकडे पुरेसे कागदपत्र नाहीत. माझ्या अर्जामध्ये जे नमूद केलेले आहे ते म्हणणे विचारात घेऊन निर्णय देण्यात यावा."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे व युक्तिवादावरून असे दिसून येते की, १) आयोगाने व्दितीय अपिल क्र. १२७७+१२७९/२०१७ मध्ये दिलेल्या दि. ०९/०७/२०१९ रोजीच्या आदेशाची अमंलबजावणी झाली असुन त्यानुसार तक्रारदारास निरीक्षणाची संधी दिली असता दि. १०/१२/२०१९ रोजी त्यांनी प्रत्यक्ष निरीक्षण केले असुन निर्देश सुचीनुसार त्यांनी कोणत्याही माहितीची मागणी केली नाही. निर्देश सुचीवर माहिती पाहिली असा शेरा नमुद करुन तक्रारदाराने दिनांकीत स्वाक्षरी केली आहे. त्याची प्रत आयोगास प्राप्त आहे. आयोगाच्या आदेशाप्रमाणे अंमलबजावणी झाली असल्यामुळे आयोगाचे आदेश खालील प्रमाणे आहेत.

## आदेश

प्रस्तुतचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(दिलीप ले. धारूरकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ, पुणे

जावक क्र. 610/2022/सांमा दिनांक - 29/4/22

LSG-2020